**<u>नि.क्र. ६४ व ८६ वरील अर्जातील आदेशांवरुन वादी क्र. १ तर्फे सर्वाधिकारपत्रधारक जयसिंग पवार यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र. ४ व ५ तर्फे विधिज्ञ श्री. पी.एम.नळेगावकर यांचे मार्फतः</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ हा पुर्वी पर्यायी रस्ता म्हणुन वापरत असे. हे म्हणणे खरे आहे की सदर रस्ता १९९१ साली बांधण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की स.क्र. २११ हा मुळचा काकडे कुटुंबियांच्या मालकीचा होता. स.क्र. २११ याचे एकुण क्षेत्रफळ किती आहे हे मला माहित नाही. साक्षीदाराला स.क्र. २११ चा ७/१२ उतारा दाखवण्यात आला. साक्षीदार सांगतो की त्याला सदर ७/१२ उतारा पाहुन त्यातील मिळकतीचे क्षेत्र सांगता येणार नाही. माझे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झालेले आहे. मी शिक्षक म्हणुन ३४ वर्ष नोकरी केली आहे. मला माझी वडिलार्जित शेतजमीन आहे. मला माझ्या मिळकतीचा ७/१२ उतारा दाखवल्यास त्याचे क्षेत्र सांगता येईल. मी जमीन विकत घेतल्यानंतर स.क्र. २११ चा ७/१२ उतारा पाहिला होता. त्यावेळी मी त्यातील क्षेत्र किती आहे ते पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की धाराशिव कारागृह ते सांजा हा रस्ता स.क्र. २११ मधुन जात होता. दाव्यात नमुद केलेला मजकुर की दावा मिळकतीच्या उत्तरेला स.क्र. २०५ आहे, हा बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर स.क्र. २११ हा बुबासाहेब काकडे व त्यांच्या बंधुच्या मालकीचा होता. स.क्र. २११ मधील दाव्यात नमुद केलेल्या चतुःसिमेच्या आतील ८१–आर जमीन ही बुबासाहेब काकडे व त्यांच्या बंधुच्या मालकीची होती हे दाखवण्याकरिता कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. मी त्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. स.क्र. २११ मधील दाव्यात नमुद केलेल्या चतुःसिमेच्या आतील ८१–आर जमीन ही प्रतिवादी क्र. ७ ते १० यांना वाटणीने मिळाली होती हे दाखवण्याकरिता कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ याचा सन २०११ मध्ये विस्तार/ रुंदीकरण करण्यात आली.

हे म्हणणे खरे आहे की राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ हा १९९१ मध्ये स.क्र. २११ मधुन बांधण्यात आला होता. सन १९९१ मध्ये सदर महामार्गाकरिता आमची जमीन संपादित करण्यात आली नाही. हे मला माहित नाही की प्रतिवादी क्र. १० शकुंतला काकडे हिने स.क्र. २११ व इतर जमीन वाटुन मिळावी याकरिता नि.दिवाणी दावा क्र. २५/१९८२ हा उस्मानाबाद न्यायालयात दाखल केला होता व सदर दावा मंजुर झाला होता. हे मला माहित नाही की सदर दाव्यातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी सन २००३ साली झाली व त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या पुर्वेकडील पश्चिमोत्तर हिस्सा शकुंतलाबाई काकडे यांना देण्यात आला. हे मला माहित नाही की शकुंतलाबाई काकडे यांना वाटुन देण्यात आलेल्या जमीनीच्या दक्षिणेकडील जमीन व राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या पुर्वेकडील जमीन ही प्रतिवादी क्र. ८ व ९ यांचे वडिल शामकुमार काकडे यांना वाटुन देण्यात आली. हे मला माहित नाही की प्रतिवादी क्र. ८ व ९ यांचे वडिल शामकुमार काकडे यांना वाटुन देण्यात आलेल्या जमीनीच्या दक्षिणेकडील जमीन व राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या पुर्वेकडील जमीन ही प्रतिवादी क्र. ६ अनंत काकडे यांना वाटुन देण्यात आली. हे मला माहित नाही की प्रतिवादी क्र. ६ अनंत काकडे यांना वाटुन देण्यात आलेल्या जमीनीच्या दक्षिणेकडील जमीन व राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या पुर्वेकडील जमीन ही प्रतिवादी क्र. ७ विजय काकडे यांना वाटुन देण्यात आली. हे मला माहित नाही की वर नमुद केल्याप्रमाणे ७/१२ उता–यावर नोंदी घेण्यात आल्या. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १० शकुंतलाबाई काकडे यांना वाटुन आलेली स.क्र. २११ मधील ८–आर व स.क्र. २२३/१ पैकी ७–आर अशी एकुण १५–आर जमीन त्यांनी दिनांक १८/०४/२००९ रोजी नोंदणीकृत खरेदीखतान्वये प्रतिवादी क्र. ५ कुसुम सुर्यवंशी यांना विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की सदर विक्री व्यवहाराआधारे प्रतिवादी क्र. ५ कुसुम सुर्यवंशी यांच्या नावाची नोंद स.क्र. २११ च्या ७/१२ उता–यावर घेण्यात आली. मी

खरेदी केल्यापासुन दरवर्षी स.क्र. २११ चा ७/१२ उतारा पाहात असतो. मी सन २०२४ चा स.क्र. २११ चा ७/१२ उतारा पाहिला आहे. मी त्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ कुसुम सुर्यवंशी यांचे नाव पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. ८ व ९ चे वडिल शाम काकडे यांनी स.क्र. २११ मधील त्यांच्या हिश्याची जमीन दिनांक १८/०८/२००४ रोजी प्रतिवादी क्र. ४ हनुमानदास मोदानी याला विक्री केली. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. ४ हनुमानदास मोदानी याच्या नावाची नोंद स.क्र. २११ च्या ७/१२ उता–यावर घेण्यात आली आहे. सदर नोंद मी प्रथमतः केंव्हा पाहिली हे मला सांगता येणार नाही. सदर नोंदीविरुध्द मी अपील दाखल केले आहे. मी त्याची प्रत दाखल करु शकत नाही. हे मला माहित नाही की राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ चे रुंदीकरण करतेवेळी त्याच्या आजुबाजुच्या जमीनींची मोजणी केली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याबाबत शासनाकडुन अधिसुचना जारी करण्यात आली होती. हे मला माहित नाही की सदर अधिसुचनेमध्ये प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या मिळकती संपादित करण्यात येणार असल्याबाबतचा उल्लेख होता. हे म्हणणे खरे आहे की अंतिम निवाडयानुसार प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना त्यांच्या संपादित मिळकतीची नुकसानभरपाई देण्यात आली.

३. वादी क्र. २ चे पती धनंजय पाटील यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की धनंजय पाटील यांच्या आई हयात आहेत.

(प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास तहकुब)

श्रवणोत्तर स्विकृत

Sd/–

ठिकाण–उस्मानाबाद (श्रीमती प्रज्ञा व. मेढे )

दिनांक–१७/०६/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,उस्मानाबाद